नियमित दिवाणी मुकदमा क्र.०२/२०१५

निशाण क्र. ४२ लगत

**उलट तपास वादी क. १ यांचा प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. पी.व्ही.बोडस, यांचेमार्फत सुरु—**

८. बाबाजी धोंडू वारीक हे माझे वडिल आहेत. मी दावा जमिनी मध्ये माझ्या वडिलांच्या मार्फत हक्क सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, याच न्यायालयात माझ्या वडिलांनी रे.दि.मु.क्र. २८/२००३ चा दावा दाखल केला होता. त्या दाव्यात या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वडिल यशवंत प्रतिवादी क्र. १ म्हणून होते. तसेच त्या दाव्यात या दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ हे प्रतिवादी क्र. ३ म्हणून होते. तसेच त्या दाव्यात या दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ या प्रतिवादी क्र. २ म्हणून होत्या. विजय पांडुरंग वारीक, रजनी रमेश सावंत, सखाराम बाबी बाणे, शांताराम सखाराम बाणे, वसंत सखाराम बाणे, संजय सखाराम बाणे, सुवर्णा श्रीकांत मोंडे हे या दाव्यातील प्रतिवादींचे नातेवाईक आहेत. या सर्व नातेवाईकांचा दावा मिळकतीमध्ये पूर्वी संबंध होता. विजय पांडुरंग वारीक वगैरे यांनी दावा मिळकतीमध्ये त्याचा संबंध माझ्या म्हणण्याप्रमाणे तबदील केलेला नाही. विजय पांडुरंग वारीक वगैरे यांना माझ्या वडिलांनी रे.दि.मु.क्र. २८/२००३ मध्ये पक्षकार केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मात्र त्यांना या दाव्याचे कामी मी पक्षकार केलेले नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, रे.दि.मु.क्र. २८/२००३ प्रस्तूत दाव्यातील दावा मिळकतीबाबतच होता. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा सर्वे क्र. २६३ हिस्सा क्र. १ पैकी सुमारे ०—०५—७ इतक्या क्षेत्राकरीता दाखल केला होता. त्या दाव्यात माझ्या वडिलांनी प्रतिवादी यशवंत वारीक, पार्वती वारीक, प्रकाश वारीक, विजय पांडुरंग वारीक व रजनी रमेश सावंत यांच्या विरोधात कायम मनाईची मागणी मागितली होती. त्या दाव्यात माझ्या वडिलांनी दावा मिळकतीपैकी ०—०५—७ एवढया क्षेत्राचा कब्जा मिळावा अशी मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, रे.दि.मु.क्र. २८/२००३ मध्ये प्रतिवादी हजर झाले होते, त्यांनी म्हणणे दिले होते, पुरावे दिले होते. त्या दाव्यात वादीने दावा मिळकतीत त्याची कायदेशीर कब्जेवहिवाट सिध्द केली का? हा मुद्दा काढला होता. त्या दाव्यात दोन्ही ही बाजूच्या पुराव्यावरून दि. ०५/०२/२००९ रोजी निकाल देण्यात आला. तो दावा फेटाळला

पण कोणत्या कारणाने फेटाळला हे माहिती नाही. त्या दाव्यात वादीने दावा मिळकतीतील कायदेशीर कब्जेवहिवाट सिध्द केली का या मुद्दयाचा निष्कर्ष नकारार्थी देवून दावा फेटाळण्यात आला या विषयी मला माहिती नाही. सदर दाव्यावर माझ्या वडिलांनी नि.दि.अपिल क्र. ३३/२००९ दाखल केले होते. वडिलांच्या पश्चात ते अपिल मी पुढे चालवले. त्या अपिलामध्ये वादी हा दावा मिळकतीमधील त्याचा स्वतंत्र कब्जा शाबित करतो का? हा मुद्दा काढला होता हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या अपिलामध्ये वादी हा दावा मिळकतीमधील त्याचा स्वतंत्र कब्जा शाबित करत नाही म्हणून त्या बाबातचा निष्कर्ष नकरार्थी नोंदवला होता. हे म्हणणे खरे आहे की, आमचे अपिल गुणदोषावर फेटाळण्यात आले. रे.दि.मु.क्र.२८/२००३ व नि.दि.अपिल क्र. ३३/२००९ यांच्या न्यायनिर्णयाच्या नक्कला आम्ही मिळवल्या होत्या. त्या नक्कला मी स्वत: वाचलेल्या नाहीत. त्या निकालांची माहिती मी वकिलांकडून समजावून घेतली आहे. सदर अपिलाच्या निकालावर मी उच्च न्यायालयात अपिल दाखल केलेले नाही.

१०. दावा मिळकतीचा सातबारा उतारा मी पाहिला आहे. या कामात मी तो दाखल ही केला आहे. आता मला दावा मिळकतीचा सातबारा उतारा दाखवण्यात आला. त्यामध्ये तु. असे नमूद असून फेरफार क्र. १०४८ नमूद आहे. फेरफार क्र. १०४८ मी वाचला आहे तो तुकडयाचा आहे. तुकडयाचा म्हणजे तुकडेबंदी कायदयातील तरतुदीचा आहे. पडेल गावातील तुकडे असलेल्या जमिनीच्या उता—यास फेरफार क्र. १०४८ नुसार तुकडा म्हणून नोंद केल्याचे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे क्षेत्र प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असल्याने तुकडा म्हणून सातबारा पत्रकी करण्यात आली आहे. १९४७ नंतर दावा मिळकतीच्या क्षेत्रामध्ये बदल झाला होता. साक्षीदार पुन्हा सांगतात की, १९४७ नंतर दावा मिळकतीच्या क्षेत्रामध्ये बदल झालेला नाही. फेरफार क्र. १०४८ विरूध्द मी कोठेही तक्रार अपिल दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. २६३ हिस्सा क्र. १ या क्रमांकाची गावात एकच मिळकत म्हणजेच दावा मिळकत होय.

दावा मिळकतीच्या पश्चिमेस सर्वे क्र. २६३ हिस्सा क्र. १ ही मिळकत नाही. आता मला माझा सरतपास दाखवण्यात आला त्यामधील परिच्छेद २ ओळ क्र. २ व ३ मधील मजकूर 'दावा मिळकतीच्या पश्चिमेला आमच्या मालकी वहिवाटीची सर्वे क्र. २६३ हिस्सा क्र. १ ही मिळकत आहे' हे बरोबर आहे. या दोन्ही परस्पर विरोधी कथनांमधील पहिले कथन खोटे आहे व दुसरे कथन बरोबर आहे.

११. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत प्रतिवादींची वडिलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचे वडिलोपार्जित राहते घर व गोठा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या घर व गोठयाच्या बाजूला प्रतिवादींची घर परसू वहिवाट आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीपैकी काही भाग शेत जमिन स्वरूपाचा आहे. ती शेतजमिन प्रतिवादींच्या घराच्या पाठीमागे आहे. त्या शेतजमिनी मध्ये भातशेती केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, त्या शेतजमिनीच्या पश्चिमेला पाणंद रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, पाणंद लगत आणि दावा मिळकतीच्या उत्तरेस दगडी गडग्याचे कुंपण आहे. त्या
घराच्या पाठीमागे असणा—या भातशेती तीन—चार कोपरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, भात शेती करणे, त्याचे उत्पन्न घेणे हे प्रतिवादीच करतात. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये घर क्र. १८१ अस्तित्वात नाही.

१२. दावा मिळकतीच्या पश्चिमेला माझ्या म्हणण्याप्रमाणे सर्वे क्र. २६१ हिस्सा क्र. २ ही मिळकत आहे. सर्वे क्र. २६१ हिस्सा क्र. २च्या सातबारा पत्रकी माझे किंवा माझ्या वडिलांचे नाव नाही. तसेच त्या सातबारा पत्रकी सर्व वादींची देखील नावे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे क्र. २६१ हिस्सा क्र. २ या मिळकतीशी आमचा काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीलगत सर्वे क्र. २६१ हिस्सा क्र. २ ही आमचीच आहे हे दाखवण्याकरीता केवळ त्याचा उल्लेख माझ्या सरतपासात केला आहे.

१३. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींची वाडवडिलांपासून वहिवाट सुरू आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या वहिवाटीमध्ये

बदल झाला आहे. तसा बदल झाल्याचा कागद माझ्याकडे उपलब्ध आहे. तो या कामात मी हजर केलेला नाही. ते हजर करण्यास मला काही कारण नव्हते.

१४. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये मला हक्क नोंदणीकृत दस्तान्वये प्राप्त झाले आहेत. त्या नोंदणीकृत दस्तामध्ये चतु:सीमा नमूद केलेल्या नाहीत. दावा मिळकतीबाबत माझ्या वडिलांनी महसूल खात्याकडे अर्ज करून सर्वे क्र. २६३ हिस्सा क्र. १अ ते १क असे दुरूस्त आकारफोड पत्रक करून घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, परंतू दुरूस्त आकारफोड पत्रक याचा अंमल दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी केव्हाही झालेला नाही. आजही दावा मिळकतीचा सातबारा सर्वे क्र. २६३ हिस्सा क्र. १ असाच आहे. हे म्हणणे खरे नाही की, कारण दुरूस्ती आकारफोड पत्रक महसूल खात्याने तुकडेबंदी कायदयातील तरतूदीच्या विरूध्द असल्याने रद्द केला म्हणून त्याचा अंमल केलेला नाही.

१५. याच न्यायालयात मी पांडुरंग वारीक वगैरे यांचेविरूध्द रे.दि.मु.क्र. ०३/२०१६ चा दावा दाखल केला आहे. तसेच माझ्या वडिलांनी दत्ताराम वारीक वगैरे यांचेविरोधात याच न्यायालयात दावा दाखल केल्याचे मला माहिती नाही. माझ्याविरूध्द याच न्यायालयात रमेश वारीक वगैरे यांनी दावा दाखल केला होता. तो दावा मंजूर होवून त्याविरूध्द मी वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल केले आहे. संजय भिकाजी वारीक यांनी माझ्या वडिलांविरूध्द याच न्यायालयात दावा दाखल केल्याचे मला माहिती नाही. यशवंत दामाजी वारीक यांनी माझ्या वडिलांविरूध्द याच न्यायालयात दावा दाखल केला होता. संदीप मधुकर वारीक यांनी माझ्या वडिलांविरूध्द याच न्यायालयात दावा दाखल केल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या स्वत:चे विरूध्द सरकारी कर्मचा—यास मी मारहाण केली म्हणून याच न्यायालयात केस दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल बाबाजी धोंडी वारीक हे गावातील सधन इसम होते. माझे वडिल आंब्यांच्या फळांचा करारचा व्यापार करायचे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल लाकूड व्यवसायाचा

व्यापार करायचे. हे म्हणणे खरे आहे की, महावितरणाच्या कर्मचा—यास मी मारहाण केली म्हणून माझ्या विरूध्द गुन्हा दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझे वडिल साम दाम दंड भेद वापरून बळजबरीने लोकांच्याकडून जमिनी बळकावून लोकांना त्रास देण्याचा उद्योग करीत आहे.

१६. प्रतिवादी हे आमच्याच वंशावळीतील असल्याबाबतचे नातेसंबंध दर्शवणारी वंशावळ मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यात आणि प्रतिवादींच्यात कोणतेही नाते नाही, केवळ आडनाव व समाज एकच आहे.

१७. राजाराम वारीक यांच्या इतर जमिनी नाहीत. प्रतिवादींच्या जमिनींचा खातेउतारा मी गावच्या तलाठयाकडून घेतलेला नाही. प्रतिवादी यांच्या गावामध्ये एकूण किती मिळकती आहेत याची माहिती मी गावकामगार तलाठीकडून घेतलेली नाही. प्रतिवादींच्या मिळकतीमध्ये अन्य कोणी सहहिस्सेदार आहेत का याची देखील मी माहिती घेतलेली नाही. मी ज्याच्याकडून मिळकत खरेदी केली त्यांच्या व प्रतिवादी यांच्या कुटुंबियांच्या अन्य काही मिळकती आहेत का या विषयी मी माहिती घेतलेली नाही. माझ्या कुटुंबियात व प्रतिवादींच्या कुटुंबियांमध्ये गेली २५ वर्षे झाली वाद आहेत. एकमेकांविरूध्द मारहाण केली, डोकी फोडली या बाबतच्या केसेस दाखल होत्या याविषयी मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे कुटुंब आणि प्रतिवादींचे कुटुंब यांच्यामध्ये टोकाचे वितुष्ट आहे. माझे कुटुंबिय व प्रतिवादींचे कुटुंबियांत पूर्वी २५ वर्षे बोली भाषण नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी व प्रतिवादींनी प्रत्यक्षपणे व त्रयस्थ इसमांकडे गेली २५ वर्षे दावा मिळकतीबाबत चर्चा केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, डिसेंबर २०१४ मध्ये माझ्यात आणि प्रतिवादींमध्ये दावा मिळकतीबाबत बोलणे झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये नमूद कारण हे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये माझी कधीही वहिवाट नव्हती केवळ प्रतिवादींचीच आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत माझा हिस्सा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला त्रास देण्यासाठी चुकीचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्या स्वरूपात दावा दाखल केला आहे तो चालण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेला दावा मुदतीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा

दाखल करून खोटे शपथपत्र दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

दि.२४/०७/२०१९.

सही/—

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड